कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक/वृत्तसंपादक

(हनुमंत गोफणे)
जनता संपर्क अधिकारी
बेस्ट उपक्रम
दूरध्वनी क्र.२२७९९३९५

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

प्रसिध्दी पत्रक क्र.४९
दिनांक : १३.१२.२०१६

## नवीन वीजदर पत्रकानुसार बेस्टचे वीजदर कमी

मुंबई, १३ : " बेस्ट ची वीज महागणार " या मथळयाखाली गेले दोन ते तीन दिवस काही दैनिक वृत्तपत्रामधून वस्तुस्थिती विपर्यस्त बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत. या अनुषंगाने वीजग्राहकांसमोर खरी वस्तुस्थिती आम्ही मांडत आहोत.

आतापर्यंत बेस्ट उपक्रमाचा वीजवहन (Wheeling) आकार हा ऊर्जा आकार (Energy charge) मध्ये अंतर्भूत होता. परंतु, यावर्षी दिनांक १ ऑक्टोबर २०१६ पासून वीज नियामक आयोगाने हा आकार त्यांनी दिलेल्या बेस्टच्या बहुवार्षिक वीजदर आदेश पत्रकात वेगळा दर्शविला आहे.

अर्थात वीजवहन (Wheeling) हा अतिरिक्त भार नसून, पुर्वी ऊर्जा आकार (Energy charge) मध्ये समाविष्ट असलेला पण आता नवीन बहुवार्षिक वीजदराप्रमाणे स्वतंत्ररित्या दर्शविला आहे.

महत्त्वाचे म्हणजे बेस्टचे वीजदर आता नवीन वीजदर पत्रकाप्रमाणे १३ ते २४ टक्के इतके कमी झालेले आहेत हे खालील तक्त्यावरुन स्पष्ट होते.

### घरगुती वापरासाठी वीजदर

| स्लॅब (Unit) | १ ऑक्टोबर २०१६ पूर्वीचे दर ऊर्जा आकार/Energy Charge (रुपये) | ऑक्टोबर २०१६ पासून | | | एकुण वीजदर कपात |
|---|---|---|---|---|---|
| | | उर्जा आकार/ Energy charge (a) (रुपये) | वीजवहन/ Wheeling (b) (रुपये) | एकूण आकार (a+b) (रुपये) | |
| ०-१०० | ३.९३ | २.०० | १.४२ | ३.४२ | १३% |
| १०१-३०० | ८.१६ | ४.४५ | १.४२ | ५.८७ | २८% |
| ३०१-५०० | ११.२९ | ७.३० | १.४२ | ८.७२ | २३% |
| ५०१-१००० | १३.९९ | ९.३० | १.४२ | १०.७२ | २४% |

=====